# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 2277 / शि.वि. / 2016
दि. 31 / 08 / 2016

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य.शाळा
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– "आदर्श शिक्षक पुरस्कार–2016" वितरण सोहळयास उपस्थित राहण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महानगरपालिका अधिनस्त शाळेत कार्यरत शिक्षकांनी शाळेतील विद्यार्थ्यांप्रती केलेल्या उकृष्ठ कार्याची दखल घेवून त्यांना मनपा प्रशासनातर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार देवून त्यांचा गुणगौरव "शिक्षक दिनी" केल्या जातो. आदर्श शिक्षक पुरस्कार – 2016 वितरण सोहळा दि.03.09.2016 रोजी विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकूल चौथा माळा, झांसी राणी चौक, नागपूर येथे सकाळी 9:30 वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास शाळेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक यांनी राष्ट्रीय गणवेषात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. या कार्यक्रमास मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, शिक्षण समिती तसेच मा.आयुक्त, मा. अपर आयुक्त, मा.उपायुक्त व इतर गणमान्य व्यक्ती उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमात सन 2011 व सन 2012 मध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांनाही मनपा प्रशासनातर्फे प्रमाणपत्र बहाल करण्यात येणार आहे.

तरी आपण सर्व माध्यमाच्या सर्व शाळा सकाळी एकाच पाळीत भरवून सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यक्रमाच्या स्थळी उपस्थित रहावे. कार्यक्रम स्थळी 100% टक्के शिक्षकांची उपस्थितीची नोंद घेण्यात येईल. सर्व उपस्थितांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

**टीप :– सन 2016 मधील सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचाही सत्कार करण्यात येणार आहे. त्यांनासुध्दा आपल्या स्तरावर कार्यक्रमात आमंत्रित करावे.**

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.सभापती, शिक्षण समिती, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2) मा.उपायुक्त–1, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.
3) अध्यक्ष, शिक्षक संघ, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव.

pc:2/reshma/tembhurne /letter T